# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०८/२०२४ (सोमवार) सकाळ**

---

## ऑनलाईन फसवणुकीत 1000000/—रू. थांबविण्यात नागपूर ग्रामीण सायबर पोलीस स्टेशनला यश

पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत तक्रारदार हेमंत राव वय ४८ वर्षे रा. मौदा यांना अनोळखी व्यक्तीने फिर्यादीला शेअर मार्केटमध्ये गुंतवणुक करून अधिक नफा मिळवुन देतो असे आमिष दाखवले. सदर आमिषाला बळी पडुन फिर्यादीने आठ ते दहा दिवसा मध्ये 1000000/— रूपयाची आरोपीच्या सांगण्या प्रमाणे शेअर मार्केट मध्ये गुंतवणुक केली. गुंतवणुक केल्यानंतर त्यांचे पोर्टफोलीओवर मोठयाप्रमाणात नफा दिसुन आला. सदरचा नफा व केलेली गुंतवणुक अशी रक्कम फिर्यादी जेव्हा विड्रॉल करायला गेला तेव्हा ती रक्कम त्याचे बॅक खात्यामध्ये ट्रान्सपर होत नव्हती. फिर्यादीने खुपदा प्रयत्न करून सुद्धा पैसे विड्रॉल होत नसल्याने आपल्या सोबत फसवणुक झाली हे समजले. त्यांनतर त्याने लगेच सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रार सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे प्राप्त होताच तपासाचे सुत्र हालवुन सदर तक्रारदारचे पैसे कोणकोणत्या खात्यावर ट्रान्सपर झाले याची माहिती तात्काळ घेण्यात आली. व सायबर फ्रॉड मधील आरोपी पैसे लवकर विड्रॉल करतात याची माहिती असल्यामुळे ज्या खात्यावर पैसे ट्रान्सपर झाले आहे ते सर्व अकांउट डेबिट फ्रिज केले. त्यामुळे तक्रारदारचे पैसे ज्या बॅक खात्यामध्ये गेले ते पैसे होल्ड झाले. त्यांनतर तक्रारदारला बोलवुन कोर्टा मध्ये सदर रक्कम परत घेण्याबाबत योग्य मार्गदर्शन करून मा. कोर्ट मौदा येथे पेसै परत घेणे करीता सुपूर्दनामा दाखल केला. मा. कोर्टाने कार्यवाही पूर्ण करून तक्रारदारचे फसवणुक झालेली रक्कम परत करण्याचे आदेश पारित केले. सदरची रक्कम तक्रारदाराला परत मिळाली. यांमुळे तक्रारदारने मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, सायबर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण व मा. न्यायलयाचे आभार मानले.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे मा. पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, पो.हवा. वर्षा खंडाईत, मनापोअं संगीता गावंडे, ममता सरोदे, नापोअं सतीष राठोड, पोशि मृणाल राऊत, मनीष नेवारे यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर